जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७१ दिनांक - २५/०१/२०२४**

बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर

## इन्कमटॅक्स अधिकारी असल्याचे खोटे सांगून बंबल ऑनलाईन डेटिंग ॲपवरून महिलेसोबत जवळीक साधुन त्यांची फसवणुक करणा-या सराईत गुन्हेगारास नवी दिल्ली येथुन अटक

सदर गुन्हयातील आरोपी नामे गौरव दिग्विजयसिंह पांडे, वय २८ वर्षे, राह. बी/६८, न्यु फ्रेडंस कॉलनी, नवी दिल्ली याने बंबल ऑनलाईन डेंटिंग ॲपवरून गुन्हयातील फिर्यादी यांचेशी ओळख निर्माण करून तो दिल्ली येथे इन्कम टॅक्स रेड कमिशनर असल्याचे खोटे सांगून,त्यांना लग्नाचे आमिष दाखवून,त्यांचेवर अत्याचार करून,त्याचा मोबाईल फोन बंद करून तो फरार झाला होता. सदरबाबत दिनांक ०१/११/२०२३ रोजी बंडगार्डन पोलीस ठाणे,पुणे येथे गु.रजि.नं. ३३९/२०२३ भा.द.वि.कलम ३७६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्यातील पाहिजे आरोपी गौरव पांडे याचे शोधार्थ तांत्रिकरित्या तपास केला असता तो नवी दिल्ली व उत्तरप्रदेश राज्यात शासकीय आधिकारी म्हणुन आपली ओळख सांगुन राहत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचा पोलीस उपनिरीक्षक रविंद्र गावडे, पोलीस अंमलदार कुसाळकर व सरक यांनी मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नवी दिल्ली येथे जावून शोध घेवून त्याला वर नमुद गुन्ह्यात अटक केली आहे. अटक आरोपी **गौरव दिग्विजयसिंह पांडे,वय २८ वर्षे,रा.बी/६८,न्यु फ्रेडंस कॉलनी, नवी दिल्ली** याने सिहंगड पोलीस ठाणे हददीत राहणारे तक्रारदार यांनाही तो नवी दिल्ली येथे इन्कम टॅक्स कमिशनर असल्याने त्याची शासकीय उच्चअधिकारी यांचेसोबत ओळख असल्याचे सांगुन तक्रारदार यांना आर.बी.आय. बँकेचे बनावट गोल्ड बॉन्ड देवून तसेच त्यांचे मुलीस बनावट सरकारी नोकरीचे नियुक्तीपत्र देवून त्यांची ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याने त्याचेविरूध्द सिहंगड पोलीस ठाणे गु.रजि.नं. ०५/२०२४, भादंवि कलम ४०६,४२० अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले असून सदर आरोपीने फरासखाना पो.स्टे.पुणे हद्दीमधील तक्रारदार यांची फसवणूक केलेबाबत तक्रार प्राप्त असून अशा प्रकारची अन्य कोणाची फसवणूक झाली असल्याने त्यांनी पोलीसांशी संपर्क साधावा.

सदरची कारवाई ही मा.अप्पर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे श्री.प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ २,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,लष्कर विभाग,पुणे शहर श्री.संजय सुर्वे, बंडगार्डन पोलीस स्टेशनचे व.पो.नि.श्री.संदिपान पवार यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाकडील पोलीस उपनिरीक्षक रविंद्र गावडे, महिला पोलीस उपनिरीक्षक,वैशाली तांगडे, सफौ. मोहन काळे, पोलीस अमंलदार अनिल कुसाळकर, संजय वणवे, शिवाजी सरक, मनोज भोकरे, ज्ञाना बडे, विशाल मोहिते यांचे पथकाने केली.